इकडून पळून जावे असेही त्याला वाटले. हा सर्व प्रकार फार झाले तर पाच सात मिनिटांचा होता. काय करावे तें लेखकाला कांही सुचना. तो दिङ्मूढ झाला. घाबरला बावरला. बाबांच्या शरीराच्या अतर्क्य सामर्थ्याची त्याला किंचितही कल्पना नव्हती आणि त्यामुळे या प्रकाराने त्याची शारीरिक व मानसिक स्थिति त्या वेळी काय झाली होती हे त्याचे त्यालाच ठाऊक. वरील वर्णनांत अतिशयोक्तिचा यत्किंचितही प्रकार नाही

नंतर बाबांनी तो वेढा काढला आणि म्हणाले "आतां लई बर वाटत" बाबा खालीं बसले. त्यानतर आरती झाली. इतक्यात जवळच्या एका गांवां-तून-कदाचित् निमगांवाहून कोणी इसमाने एक खडी साखरेने भरलेले ताट बाबाच्या पुढे ठेवले आणि म्हणाला " बाबा, अमुक बाई दोन तासापूर्वी प्रसूति समयीं फारच अडली होती. तिने आपला एकसारखा धांवा केला. तेव्हां तिची तात्डतोब सुटका होऊन तिला मुलगा झाला म्हणून हे खडीसाखरेचे ताट आपणाकडे पाठविण्यांत आले आहे. "

बाबा किंचित् हासले. त्या इसमाच्या घरच्या सर्व मडळीचीं बारीक सारीक विचारपूस केल्यावर बाबांनीं ती खडीसाखर तेथे बसलेल्या सर्व मंडळीस वाटली. लेखकाला खडी साखरेचे दोन खडे मिळाले. त्यातील लहान खडा त्याने तात्काळ तेथेच तोडांत टाकला आणि दुसरा खडा मुंबईस आपल्या मुलामाणसाना बाबांचा प्रसाद म्हणून देण्यासाठीं आणला. जो खडा त्याने अद्यापि आपल्याजवळ या प्रसगाची साक्ष म्हणून जपून ठेवला आहे.

हें सर्व कसे घडते याचा आधुनिक पाश्चात्य ज्ञानाच्या अनुसरणीनें विचार करूं या. या पूर्वींचे जे या प्रकारचे लेख आले आहेत त्यासंबंधाने श्रीचे निस्सीम भक्त लेखकापाशीं हंसू लागले. कारण त्यांना श्रींच्या अमर्याद व अतर्क्य सामर्थ्याची पूर्ण जाणीव आहे. परंतु हे लेख लिहितांना या सर्व भाकडकथा आहेत अशा विचाराच्या पाश्चात्य शास्त्रे शिकलेल्या आधुनिक विद्वानाची ज्या रीतीने समजून पडेल, त्याप्रमाणे लिहिण्यांत येत असल्यामुळे श्रीचे निस्सीम भक्त लेखकाला क्षमा करतील अशी त्याना सप्रेम विनंती आहे.

म्हणून प्रथमत. ईश्वराचे अस्तित्व प्रतिपादन करण्यात आले, त्यानतर आपल्या शरीरांतर्गत असलेल्या अश्वत्थवृक्षद्वारे परमेश्वराची प्राप्ति करतां येते. आणि तसे करतांना आपल्या प्रत्येकामध्ये किती तरी प्रचंड सामर्थ्य आहे याची जाणीव देऊन, ते सामर्थ्य हस्तगत करण्यासाठी व आत्म-विश्वास जागृत करण्यासाठी काय स्वल्प व विन पैशाचे उपाय योजावे याचेहि दिग्दर्शन करण्यांत आले. संतांचा महिमा काय ! संताची सत्ता काय ! आणि ते आपल्या प्रत्येकासाठी किती व कसे कष्ट करीत असतात याचे विवेचन आतां साहजिक रीत्या होत आहे, श्री साईबाबांची शरीरयष्टि वरपागी पहा-णाराला देखील आश्चर्यकारक वाटत असे. चावडीतून परत येताना त्याचे अत्यंत थकलेले शरीर तेच देवळात आल्यावर आणि धुणीजवळ त्याचे विश्री झाल्यावर तास अर्ध्या तासाच्या आत त्या शरीरांत झालेला आश्चर्यकारक फरक ज्यानी पाहिलेला आहे त्यांचें त्यामुळे श्री साईबाबावर प्रेम बसल्यास कांहीं नवल नाहीं.

नंतर गोणपाटाच्या त्या रकटयावर वसून दर्शनासाठीं येणाऱ्या सर्व प्रकारच्या माणसांचा ते स्वत: परामर्श घेत. त्याचीं सुखदु:खाची गाऱ्हाणीं ऐकून त्यावर त्यांचे कधीं साधे कधीं अनर्घ्य उपाय ते योजीत. प्रसाद वगैरे सर्व लहानथोरांना सारख्या प्रकाराने देत आणि तसे करतांना कोण-त्याही प्रकारचा धर्मसंबधाने ते भेदभाव ठेवीत नसत. हिंदू, मुसलमान, पार्शी ख्रिस्ती वगैरे सर्व धर्माच्या आणि पंथाच्या लोकांना बाबा आपलेच आहेत. असे वाटत असे, कुतर्क वृत्तीच्या इसमाला त्याचे मनोगत जाणून त्याला पूर्ण व अचूक आणि त्यालाच कळेल असा दाखला देऊन त्याला त्याच्या कर्त-व्याची व स्वधर्माची जाणीव करून देत. आणि तसे करतांना इतराविषयीं सहिष्णुता त्यांच्या हृदयात उत्पन्न होत असे.

(१) एकदां कै. श्रीमंत गोपाळराव बुट्टी हे वाख्याच्या तडाख्यांत सांप-डले. दोन चार भयंकर रेच होऊन त्यांची गात्रे शिथिल झाली. काकासाहेब दीक्षित बाबांच्या जवळ उपायासाठीं गेले असतां, बाबांनीं शाळेत ( कै. राधा-

कृष्ण आईच्या ) एका उघडया डब्यांत असलेल्या कैक दिवसाच्या बाजरीच्या भाकरीचे तुकडे कुसकरून त्याची आंबील देण्य स सांगितले. आणि शाबास त्या भक्तशिरोमणीची की, त्यानीं ती आंबील सेवन केली आणि तिचा गुण आला. कोणत्या आधुनिक डॉक्टराची असा उपाय योजण्याची छाती होईल [1]

गोरगरीब दु:खग्रस्त ज्यांना बाबा "तडी तापडी" असे बोलत असत, मग ते जवळ अथवा शेकडो कोसांवर असले तरी त्याची हांक ऐकून त्यांच्या शारीरिक व मानसिक दु:खाचा परिहार बाबा करीत असत या सर्व गोष्टींची साक्ष सर्व भक्त देत आहेत.

ज्या ज्या भाग्यवान् प्राण्यांना त्यांच्या मुखावरचे विशेप प्रकारचे स्मित पाहाण्याचा योग प्राप्त झालेला आहे, त्यांना त्यांचे ते अवर्णनीय स्मित त्यांच्या मन:चक्षूपुढे कायमचे राहून त्याना त्यामुळे अमर्याद शांति व समाधान मिळत आहे हा श्री सांई बाबांचा संसार. आणि हाच संसार आपल्या या अनुपम देशातल्या सर्व साक्षात्कारी दैवी पुरुषांच्या चरित्रांत, कृतीत आणि लेखनांत दिसून आला आहे व यापुढेही दिसेल.

श्री तुकोबाराय म्हणतात " देह कष्टवीती नानापरी" तें हेच या सर्व सतांना स्वत:ला साक्षात्कार होऊन स्वत: परमेश्वराच्या स्वरूपांत लीन झाल्यामुळे स्वत:सबधाने आणखी कांही करावयाचे राहात नाहीं. तरी आपल्याला जी प्राप्ती झाली आहे ती ससारत्रस्त लोकांना देण्यासाठी रात्रंदिवस त्यांचा प्रयत्न चालू असतो.

कोणाला स्वप्नांत दर्शन देऊन बोध करणे, कोणाला दूर प्रदेशांत जड शरीरांत दर्शन व उपदेश करणे, कोणाला योग्य तीच पोथ्यापुस्तके वाचण्याची अथवा रचण्याची स्फूर्ति देणे, कोणाच्या शरीराच्या व्याधी आपल्या शरीरात आकर्षून त्याला व्याधीमुक्त करणे, असे त्यांचे सदोदित प्रयत्न चालू

१ याचाही उलगडा पुढें एखाद्या लेखात होईल.

असतात. जेणेकरून जगन्नियंत्या श्रीभगवंताचे स्मरण होऊन त्या जीवाच्या जन्माचे सार्थक व्हावे.

आतां हे सामर्थ्य त्यांना कसे प्राप्त होते हा प्रश्न आधुनिक विद्वान साहजिक रीतीने करतील. त्यांना इतकेच सांगावयाचे आहे कीं, मागल्या अकांत प्रतिपादन केल्याप्रमाणे सतांना आकाश तत्वाचें आकलन झालेले असते. हे झाले म्हणजे दूरचे ऐकणे व पाहाणे या ज्या योगशास्त्राच्या केवळ खालच्या पायऱ्या आहत त्याच्या किती तरी दूरवर त्यांची मजल गेलेली असते. त्यामुळे त्यांना सर्वांचीं अंतःकरणे, विचार, मनोवृत्ति, तसेच शारीरिक व्यापारधर्म त्यांना आरशासारखे स्पष्ट दिसत व कळत असतात. आणि म्हणूनच त्यांच्यापाशीं येणाऱ्या जीवाला कोणत्या प्रकाराने खरे सुख प्राप्त होऊन त्याची खरी उन्नति कशी होईल आणि त्यासाठी कोणता योग्य उपाय योजावा हे त्यांना अचूक कळते; आणि ते तसा उपाय योजीत असतात.

"आपल्या सारिखे करिती तात्काळ, नाहीं काळ वेळ तयां लागीं" या श्री तुकोबारायांच्या उक्तीचें विवेचन लेखकाने पुष्कळांना त्याच्याजवळ करतांना ऐकले आहे. आणि बाबा त्याप्रमाणे आम्हाला आपल्यासारखे ( सामर्थ्यवान् ) कां करीत नाहीत म्हणून ते आक्षेप घेत असत. या सर्व मंडळीची भावना इतरापेक्षां आपले स्वतःचे ऐहिक ऐश्वर्य वाढावे, मुले, लेकरें, नोकर, चाकर दास, दासी, बगले इमारती आपल्याला मिळाव्या, आपली जगांत या प्रकारची मानमान्यता वाढावी अशीच असे. बाबांचे अफाट व अलौकिक सामर्थ्य अशा वासनायुक्त मनुष्यांना मिळावे कसें.

परंतु जे प्राणी अशा वासनांपासून दूर राहून केवळ प्रभुप्राप्तीसाठीं रात्रंदिवस तळमळ करीत, त्यांना त्यांचा योगक्षेम अबाधित चालवून अपूर्व देणग्या श्री सांईबाबांनीं दिल्या आहेत.

आकाश तत्वापर्यंतच पाश्चात्य शिक्षण प्राप्त झालेल्या आधुनिक विद्वानांचा विचार जाऊ शकतो. आकाशतत्व Ether ही कांहीं लहान सहान

गोष्ट नाहीं. आकाशाचे व्यापकत्व कांही थोडया प्रमाणाने एक्सरे, व्हायोलेटरे, रेडियम आणि दुसऱ्या याच प्रकारच्या दृश्य आणि अदृश्य किरणांनी, तसेच रेडियो, टेलेव्हिजन वगैरे शास्त्राच्या आधाराने काहीसे दृग्गोचर होते. या नवीन शास्त्रांच्या अध्ययनाने आपण आश्चर्यचकित होतो. परंतु आपल्या शरीरात त्याहून किती तरी पटीने आश्चर्ये भरलेली आहेत ही बाह्य सृष्टि आपण डोळ्यानी पाहातो ती दिसते कशी? नाकाने वास घेतो, कानानी ऐकतो, त्वचेला स्पर्श वगैरे सर्व कळते कसे? आणि या इंद्रियानी घेतलेले अनुभव मेंदूच्या कप्प्याच्या दप्तरांत ठेवून जेव्हां जेव्हा गरज लागते तेव्हां तेव्हा त्या त्या कप्प्यांतून त्याच गोष्टीची अचूक तीच स्मृति होते कशी, याचा पाश्चात्यांनी केवळ वरपांगी शोध लावला आहे. त्याच्या कितीतरी दूरवर आपल्या संतानी आपल्या शरीरांतर्गत असलेल्या अश्वत्थवृक्षाकरवी पूर्ण संशोधन करून आकाशादि महातत्वाचे पूर्ण आकलन करून, त्याच्या फार दूरवर जाऊन त्रिकाल ज्ञान प्राप्त करून घेतले आहे, घेतात, आणि पुढेंही घेत राहातील.

पाश्चात्य नव्या नव्या शोधाचे पूर्ण अध्ययन जरूर झाले पाहिजे आणि ते शोध व्यावहारिक उपयोगात आणिले पाहिजेत, पण तसे करतांना आपल्या जुन्या शोधांकडे साशंक बुद्धीने पाहाण्याचे कारण नाही. त्याचा शोध पाश्चात्यांना प्रभुकृपेने अद्यापि मुळीच लागलेली नाहीं आणि त्याची कारणं अनेक आहेत.

नव्या आणि जुन्या शोधांच्या मिलाफाने अनेक उत्तम अनुभव आत्मविश्वासयुक्त आपणा प्रत्येकाला सहज प्राप्त करून घेता येण्यासारखे आहे त्याकडे पूर्ण लक्ष पुरविण्यात यावें अशी लेखकाची आग्रहपूर्वक नम्र विनंती आहे.

" म्हातारा "

---

१ हें करणे आपल्या हजारों वर्षांच्या संस्कृतीमुळें आपणास मुळींच जड जात नाहीं. याचें स्पष्टीकरण पुढील एखाद्या लेखात येईल.

# अनुभव.

सन १९१७ सालची ही गोष्ट. मे महिना. श्री साईबाबांच्या पायांजवळ लेखकाच्या माहितींतला एक मुलगा व त्याची आई बसली होतीं. दोनप्रहरी तीन वाजण्याचा सुमार.

त्या मुलाजवळ श्रीनी आठ रुपये दक्षिणा म्हणून मागितली. ती रकम त्याच्याजवळ नव्हती, म्हणून वाड्यांत जाऊन कै बापुसाहेब जोगांकडून उसनवार मागून घे म्हणून त्याला सांगितले. त्याचवेळी श्री बापूसाहेबांच्या राहत्या जागी एका विदुषी बाईचें ध्रुवाख्यानावर प्रवचन चालले होते, म्हणून त्या मुलाला तेथेच ते प्रवचन ऐकणे भाग पडले, आणि त्याला तेथे बसावें लागले.

श्रीची ही रीत सर्व भक्तमंडळीला पूर्णपणे ठाऊक आहेच. दक्षिणेच्या निमित्ताने कोणा एकाला दुसऱ्या एखाद्या गृहस्थाकडे ते पाठवून देत असत; जेणेकरून त्या पाठविलेल्या मनुष्याच्या मनांतल्या शंकाकुशंका, अंतर्दृष्टीने जाणून त्या ठिकाणी चाललेल्या प्रवचनांवरून अथवा वादविवादांवरून, त्या गृहस्थाच्या मनांतल्या त्याच शंकाकुशंकांचा आपण होऊन उलगडा होत असे. बसल्या जागेवरून कोठे काय चाललें आहे, हें पूर्णपणे जाणून, जिज्ञासू भक्ताच्या मनाचे समाधान करण्याचीही श्री साईबाबांची पद्धति अत्यंत अद्वितीय होती. ही दिव्यशक्ति बाबांच्या पूर्ण स्वाधीन होती. हे वर्णन करण्यांत यत्किंचित्‌ही अतिशयोक्ति नाही हे श्रींचे नामांकित व श्रेष्ठ असे जे अनेक भक्तशिरोमणी विद्यमान् आहेत ते सानंदाश्रुपूर्ण मुद्रेने कबूल करतील.

असो. कै. बापुसाहेबांच्या येथे तो मुलगा ते प्रवचन ऐकत बसला असतां तेथें संतांविषयी तुलनात्मक संभाषण सुरू झालें. त्या मुलाला श्री साईबाबा हे पूर्ण दैवी पुरुष इतकेच नव्हे तर श्री भगवंताचे साक्षात् मनुष्यरूपि अवतरण असे वाटत असल्यामुळे त्याला ते तुलनात्मक विवेचन न आवडून आणि त्या भरांत आपणाला बाबांनी "रुपये आठ बापूसाबाकडून घेऊन ये" अशी

आज्ञा झाल्याचे विसरून तो त्या प्रवचनातून उठून रागाने श्रींकडे गेला आणि बोलला " बाबा ! मला तिकडे कशाला पाठविलेत ? "

" कां रे ! "

" तेथे तुम्हांला शिव्या चालल्या होत्या की, तुम्ही देव नाहीत; तुम्ही एक साधारण साधु आहांत. "

" मग तें काय खोटे ? अरे मी काय, एक किंचित् फकीर. मी देव नाहीं. देव किती तरी मोठा ! अरे ! त्याची बरोबरी कोणाला होणार नाही. "

" असें बोलून तुम्ही आम्हांला फसवतां, आम्हाला तुम्ही देव आहांत असे पूर्णपणे वाटते. तुम्हाला कोणी हलके बोललेले आम्ही सहन कसे करावे' संतांची जेथे निंदा होते तेथे एक क्षणभरसुद्धां बसू नये असे खरे ना ? "

" होय. "

" देवाला वाईट बोलले तर त्याचा त्याला राग येत नाहीं, पण संतांची निंदा झालेली देवाला खपत नाहीं हे खरे ना ? "

" होय. "

" मग अमुक संत मोठा, अमुक लहान पायरीचा हा वाद ऐकण्यांत फायदा काय ? " बाबा म्हणाले, " जेथे संतांची - निंदा होते तेथे एक क्षण देखिल बसू नये. "

नंतर त्याला जवळ बसवून, त्याच्या डोक्यावरून आपला वरदहस्त फिरवीत बाबा म्हणाले:—" भाऊ, पोथ्या–पुस्तके वाचावी रे ! "

" बाबा ! मला नीट वाचतां येत नाहीं. "

" तर मग असे कर. देवाचे नांव सकाळ संध्याकाळ घेत जा बरे !"

" बाबा ! मला त्याची आठवण राहाणार नाही. "

" काय ? अरे पाच दहा मिनिटे देवाचे नांव घेण्याची तुला आठव नाही होणार ? अरे माझ्यासाठीं तसे कर बरे ! "

" बाबा ! तर तें मुळीच नाही होणार ! "

" कां रे ! "

" बाबा ! तुम्हांला कबूल करून त्याप्रमाणे करण्याचें चुकले तर मला पाप लागेल म्हणून, तसे करण्याचे धाडस मी नाही करीत. "

" बरं तर भाऊ ! एक मिनिट तरी देवाचे नांव रोज घेशील ? "

" बाबा ! तेही माझ्याने कबूल करवत नाही. कां तर कोणे दिवशी मी विसरेन ! "

" अरे दिवसांतून एकदा तरी देवाचे नांव घेशील बरे ! "

" बाबा ! आणि ते घेण्याचे विसरलो, तर आपल्याला कबूल केल्याचे पाप होईल ते ? "

त्याची आई तेथे बसली होती तिच्याकडे वळून बाबा म्हणाले, आये ! तुझ्या लेकाची चिंता आतां मलाच केली पाहिजे. "

"ती दोन्ही मायलेंकरे बाबांच्या पायां पडून प्रेमाश्रुयुक्त मुद्रेनें म्हणाली " बाबा ! आमची सर्वांची आपण चिता करितां हें आम्ही जाणूनच आहोंत."

बाबा म्हणाले, " अग आये, माझ्या भक्तांची मला चिंता करावीच लागते. आणि जर माझा भक्त पडत असला तर अस्सा ( हात पुढे करून ) त्याला मी चार चार हातांनीं झेलून धरीत असतों. पडूं देत नाहीं."

तेव्हां तो मुलगा म्हणाला, " बाबा ! तुम्ही आतांच तर बोललांत कीं, मी देव नव्हे, मी किंचित् फकीर. मग तुम्हांला चार हात कसले ? "

बाबांनीं उत्तर दिले नाही. त्याच्याकडे पाहून प्रेमाने हांसले. तो मुलगा सांगतो की, ती सद्गुरुमाउलीची प्रेमपूर्वक हास्य मुद्रा जेव्हां जेव्हां तो त्याच्या मनःचक्षूं पुढे आणतो, तेव्हां तेव्हां तो कितीही विवचनेंत असला तरी त्याचे तात्काळ समाधान होते.

या सद्गुरुमाउलीच्या सस्मित वदनाचें श्री नाथांनीं आपल्या भागवतांत जे अत्यंत गोड आणि रसभरित वर्णन केले आहे, तें जिज्ञासूंनीं जरूर नजरेत आणावे.

असो, वरील हकीकतीवरून आमच्यासारख्या मूढ वृत्तीच्या मनुष्यांनीं काय बोध घ्यावयाचा ? श्री परमेश्वराची प्राप्ती कोणत्या उपायानी अथवा साधनांनी करावयाची ?

श्री साईबाबांसारखे मार्गदर्शक दैवी पुरुष साध्याभोळ्या भक्ताचे समाधान करून, त्यांना प्रेमानंदाचा लाभ देतात हे आम्ही पाहातो. पण आम्ही स्वतः पडलो चिकित्सक, पाश्चात्य विद्येच्या सस्काराने मनीला भुरळ पडलेली. अहंकारमदाने धुंद झालेले. अध्यात्म विद्येचा गंध मुळींच नाही. वायफळ बड बड मात्र खंडीभर, आमची मने वृथा शंकाकुशंकानीं बुजबुजलेली आगरे. त्यांत श्रद्धा, भक्ति, अथवा ज्ञान यांचा शिरकाव शिरकाव कसा व्हावा ? करावे काय ? व कसे ? साधने काय योजावी ? आणि ती सध्याच्या व्यापारी दृष्टीच्या जगांत स्वल्प रीतीने अमलांत कशी आणावी ?

यासाठी मागे उलगडा केल्याप्रमाणे परमेश्वराच्या अस्तित्वाची पूर्ण खात्री पहिल्याने जाहली पाहिजे प्रचलित पाश्चात्य शास्त्राचा त्याला मुळीच बाध येत नाहीं. जे ज्ञान पाश्चात्यांना होणे अशक्य ते हजारो वर्षांच्या सस्कारामुळे आपल्याला तात्काळ कळते. तसे त्यांना कळावयास अत्यंत जड जाते. परमेश्वराविषयीच्या त्यांच्या धर्मशिक्षणीमुळे, त्यांची अशी कल्पना झालेली असते की, तो एक अत्यंत वयोवृद्ध, शुभ्र दाढीयुक्त, ढगांपलीकडे मानवदेहधारी असा कोणी तरी आहे. ही कल्पना दृढ होण्याला गस्टेव डोरेच्या चित्रानीं बराच गोंधळ केला आहे, आणि त्याचप्रमाणे सैतानाच्या अस्तित्वाचीं चित्रे, आणि त्याचे मानव देहरूपि खेळ यांची प्रतिबिंबे त्यांच्या मनांवर ठसलेली आहेत. अलबत अशा चित्ररूपि ठशांचा त्यांच्या मनावर झालेला परिणाम, त्यांच्या प्रचलित शास्त्रांच्या आघाताने भग्न होउन त्यांची परमेश्वराविषयींची श्रद्धा कच्चा पायावर उभारलेली असल्यामुळे डळमळीत होउन तिची झपाट्याने वाताहत होत आहे, आणि खाणेंपिणे वगैरे इंद्रियद्वारे मिळणारें पशुतुल्य समाधान, याचा यथेच्छ सुखोपभोग घेणे यापलीकडे त्यांच्या जनतेचे ध्येय दिसत नाहीं. केवळ शारीरिक सामर्थ्यावर भिस्त ठेवून दीनदुबळ्या जनावर आपल्या क्षुद्र स्वार्थासाठीं

अमल बजावणे यापलीकडे त्यांची दृष्टि केव्हांही नव्हती व जावयाची नाही. ही परिस्थिति अधार्मिक असल्यामुळे दीर्घकाळ टिकणें शक्य नाही.

असे जर आहे तर आपण काय करावयाचे? पाश्चात्य शास्त्रांच्या अध्ययनाने परमेश्वराच्या अस्तित्वाला मुळीच बाध येत नाही हे आम्हांला कळते. त्याची अतर्बाह्य सृष्टीत चाललेली लीला आपणाला तात्काळ दृग्गोचर होते. आपल्या शरीरांतर्गत असलेल्या अश्वत्थरूपी वृक्षद्वारे त्याचें प्रत्यक्ष ज्ञान होऊन, अनुभव दुसऱ्याला देतां येतो.

ही विचार सरणी, जी पाश्चत्याना अवघड ती आपल्याला तात्काळ पटते. आपल्या संतांचा हिंदुधर्म हा एक ससार तरण्यासाठी सर्व तऱ्हांच्या सर्व बुद्धींच्या लोकांसाठीं अनेक लहान मोठया विचाररुपि नद्यांनी युक्त अशी प्रचंड गगा-नदी आहे. तिच्या या सर्व लहानमोठया फाटयांचा ओघ पूर्णपणे तिच्यांत मिसळून जाऊन हा सर्व ओघ अशा प्रकारे अव्याहत वाहत आहे कीं, जेणेकरून ससार तरून जाऊन, चित्त स्थिर होऊन समाधिरूप स्थितीने श्री भगवता-बरोबर तद्रूप होण्याला वाव मिळतो.

असे करण्याला अमूक एकाच मार्गाने चाला नाहीं तर कायमचा अधःपात होईल अशी आमच्या संतांच्या हिंदुधर्माची शिकवणूक मुळीच नाहीं. तुम्ही परमेश्वराच्या साकार सगुणरूपाचे ध्यान करा. निराकाराचे सगुणरुपीं भजन करा अथवा निराकाराचे निर्गुणरुपी ध्येय मनःचक्षूंपुढे ठेवा, सर्व उपयुक्त आहे. अमुकच पद्धतीने त्याची प्राप्ति व्हावयाची, इतर पद्धति खोटया अशा प्रकारचा धर्म आमचे संत शिकवीत नाहीत, आमच्या सतांचा धर्म सर्वव्यापि आहे. जगांत असा कोणताही धर्म नाहीं की, ज्याच्या उच्च विचारांचा समावेश आमच्या संतांच्या हिंदुधर्मांत होत नाही.

परमेश्वरावर श्रद्धा आणि निस्सीम प्रेम असले पाहिजे. तुमचा तुमच्या इष्ट मंत्रावर पूर्ण विश्वास असेल आणि तसे करण्याला इतर सवड नसेल तर झोपी जाण्यापूर्वीची आणि त्याचप्रमाणे झोपेतून उठल्यावर त्या मंत्राचा जप करावा अथवा प्रार्थना करावी. नामस्मरण तर पाहिजे त्या वेळी पाहिजे त्या.

स्थळी उत्तम प्रकारे करतां येते. आणि तसे करतांना जर या वर दर्शवि-लेल्या दोन सधीचा उपयोग केला तर कांही काळाने झोपेत देखील नाम-स्मरण श्वासोच्छ्वासाबरोबर अव्याहत चालते असा अनुभव येऊन प्रथमत. शरीर सुधारते. शरीर निरोगी झाल्यामुळे मन दुबळे राहात नाही. त्यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि आत्मविश्वासयुक्त शरीराने आणि मनाने काय काय करितां येईल आणि आत्मबलाने आपले ध्येय कोठवर नेता येईल याचा ज्याने त्याने आपआपल्याशी पूर्ण विचार करावा हे आत्मबल साध्य आहे नजर फेकून पहावे.

**" म्हातारा "**

# विनंती.

रा. रा. रामचद्र वामन मोडक या सद्गृहस्थानी श्री साईमाउलीच्या पायांपाशी जे अनुभव घेतले आहेत ते वाचून प्रत्येक साईभक्तास सप्रेम आनंद होईल यांत आश्चर्य नाही.

श्री साईबाबांच्या उदीचे अनुभव पूर्वींच प्रसिद्ध झाले आहेत.

तसेच उदबत्तीचा, धुपाचा, अथवा सुवासिक फुलाचा सुगध एकाएकी घरभर दरवळून भक्तांच्या कुटुबांतील लहानथोर सर्व मडळीला आलेले अनु-भव लेखकाला ठाऊक आहेत, आणि ते प्रसिद्ध करून श्री. मोडक यानीं सर्वांना ऋणी केले आहे.

इतर भक्तांनी या प्रकारचे आपणांस आलेले अनुभव जरूर पाठवावे अशी त्यांस सप्रेम व विनयपूर्वक विनती करण्यांत येत आहे.

**रा. आ. तर्खड**
**व्यवस्थापक**
**श्री साईलीला.**

# श्री सद्गुरू सांईबाबा.

माझे मित्र श्री. निळकंठराव सहस्रबुद्धे यानी कांही वर्षापूर्वी श्री समर्थ साई-बाबांच्या सबंधाने माझ्या स्वतःचे कांही अनुभव असल्यास ते श्रीसाई लीला मासिकाकरिता लिहून पाठवावे असे सुचविले होते. परंतु अशा प्रकारचे अनुभव ज्याचे त्यानेच उपभोगावयाचे असतात, फार तर तितकेच प्रेमाचे आप्त स्वकीय किंवा जिव्हाळ्याचे मित्र यांनाच ते सांगावयाचे असतात अशी माझी त्या वेळी दृढ भावना होती. म्हणून श्री. सहस्रबुद्धे यांस मी नकारार्थी उत्तर पाठविले असे स्मरते. तरी ही माझी भावना बरोबर आहे किंवा चुकीची आहे या बद्दल बरेच दिवस माझा विचार चालू होता. अशा स्थितीत मी आपल्या मनाशी असे ठरविले की, श्री साईबाबाकडूनच तशी स्फूर्ति म्हणजे सूचना मिळाल्यास माझे अनुभव साईलीला मासिकात छापण्याकरिता पाठवाव. माझ्या संकेताप्रमाणे एक प्रकारचा हुकूमच श्रीबाबांकडून झाल्यामुळे मी हे एक वेळ नाकारिलेले काम आज हाती घेत आहे. संत, संतचरित्रे व संतसमागम या त्रई संबधानें अलीकडे बरीच चर्चा होऊ लागली आहे, व त्यात दोन्ही बाजू म्हणजे अंधश्रद्धा व सोपपत्तिक विवरण मांडण्यांत येत आहे. योगेश्वर श्री. मुकुंदराज यांनीं आपल्या आपल्या " परमामृतांत " गुरु कृपेने मिळालेल्या अपरोक्ष साक्षात्कारासंबंधाने पुढील प्रमाणे बजाविले आहे: — " हे शास्त्र गौप्य करावे । कवणा स्फुट न सांगावे ॥ तुझे तुवां अनुभवावे ।" इत्यादि. हीच गोष्ट किंवा हाच नियम प्रस्तुत विषयासही लागू आहे, अशी माझी समजूत त्या वेळीही होती व अजूनही आहे. त्याच प्रमाणे " गुज घेऊन चावट होतील बहु " असेही त्यांनीं बजावले आहे, हे विसरतां कामा नये. असो. या वादग्रस्त विषयासंबधाने जास्त चर्चा न करितां श्री साई-बाबांच्या सान्निध्यांत असतांना मला जे थोडे अनुभव आले ते आज लिहून काढीत आहे. पुढील अनुभवांत ज्या व्यक्तीचा नामनिर्देश आलेला आहे त्या

पैकी बऱ्याच व्यक्ति आज दिवगत झाल्या आहेत, व त्याच प्रमाणे " शिर्डी संस्थान " या नांवाने जी संस्था स्थापन झालेली आहे, व त्या संस्थेशी ज्या काही व्यक्तींचा संबंध आलेला आहे त्याबद्दल मला विशेष माहिती नाहीं.

मी नोकरीसबंधाने सन १९०७।८चे सुमारास धुळ्यास गेलो असता माझे मित्र प. वा बाळासाहेब भाटे यांच्या तोंडून श्रीसाईबाबांचे नांव पहिल्याने ऐकिले. त्या वेळी मला सत्पुरुषाच्या समागमाचा प्रत्यक्ष योग आलेला नव्हता व त्यांच्यासंबधाने माझी एक प्रकारे तटस्थ वृत्ति होती असे म्हटले तरी चालेल. त्या सुमारास बाळासाहेब भाटे आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन, शिर्डीस जाण्याकरिता धुळ्यास आले होते, व त्यांच्या चर्येवर एक प्रकारच्या वैराग्याची छटा दिसत होती. माझा स्वतःचा कल वेदांताकडे असल्याने मी त्यांस "दासबोध," "परमामृत" अशा प्रकारचे ग्रंथ बरोबर घेऊन जाण्याचे सुचविले, व त्यांनीही विशेष ऊहापोह न करितां, त्यापैकीं खुद्द धुळ्यास जीं पुस्तकें मिळण्यासारखी होती तेवढी विकत घेऊन ते पुढे रवाना झाले. त्यानंतर इ. स. १९०९ मध्ये मी फिरतीवर असतांना अहमदनगरास माझे मित्र प्रो. भानू यांची गाठ पडली. त्यांनीं त्या वेळी एक वेळ शिर्डीस जाऊन श्री साईबाबांचे दर्शन घेण्याविषयी आग्रहाची सूचना केली. पुढे थोड्याच दिवसांत मला सरकारी कामाकरितां संगमनेरास जाऊन यावयाचें होते. तेथील काम संपवून मी परत येण्याच्या आदल्या दिवशी रात्री मला शिर्डीस जाण्याची स्फूर्ति झाली. व त्याप्रमाणे माझ्या घरच्या मंडळीस कळवून कोपरगांवास गेलो, व तेथील त्या वेळेचे मामलेदार श्री. बाळासाहेब मिरीकर याच्या घरी उतरून तिसरे प्रहरी पुढे शिर्डीस गेलो. त्या वेळी माझ्याबरोबर माझे सहव्यवसाई एक गृहस्थ होते. शिर्डीस पोहोचण्यापूर्वी आम्ही दोघांनी श्री बाबांस दक्षिणा देण्याकरितां प्रत्येकीं दोन रुपये निराळे काढून घेतले होते. बाकीचे पैसे माझ्या बरोबर आलेल्या गृहस्थानें निराळ्या खिशांत ठेवले होते. श्री बाबांच्या दर्शनास आम्ही दोघेही एकदमच मशिदींत गेलो, व नारळ पुढे ठेवून आणि उदबत्ती नारळ नमस्कार करून बाबांच्या समोर बसलो. कांही वेळ बाबा माझ्याकडे पाहात होते व नंतर त्यांनी मला

" दक्षणा देतोस काय ? " असे विचारल्याबरोबर मी माझ्याजवळचे दोन रुपये काढून त्यांच्या हातांत ठेविले. त्यानंतर बाबांनी माझ्याबरोबर गेलेल्या गृहस्थाजवळ दक्षणा मागितली. तेव्हां त्याने आपल्या खिशांतून एकच रुपया काढून बाबांस दिला. त्या वेळी बाबा म्हणाले ' "लोक किती लबाड असतात आपण फकिराला देण्याकरितां दोन रुपये बाजूला काढून ठेविले असून, आतां एकच कां देतां ? वाट खर्चास पाहिजे तर दुसऱ्या खिशात काय कमी आहेत ? " हे ऐकून तो गृहस्थ खजील झाला. नतर उदी देऊन बाबानी आम्हाला वाड्यांत जा असे सांगितले, व आम्ही मशिदींतून बाहेर पडलो. माझी कल्पना अशी झाली की, बाबानी जो वाडा सांगितला त्यातच माझे मित्र बाळासाहेब भाटे राहात असावे, परतु वाडा कोठे आहे हे आम्हांस माहित नसल्यामुळे बाबांकडेच जाण्याकरिता आलेल्या एका गृहस्थास विचारतां त्याने सांगितले की, " बाबांनी वाड्यांत जा म्हणून सांगितले असेल तर तुम्ही साठे याच्या वाड्यांत जाऊन तेथे एक लिंबाचे झाड आहे त्याचे दर्शन घेऊन त्यास प्रदक्षणा घाला. " त्याप्रमाणे करून आम्हीं पुढें बाळा-साहेब राहात होते तेथे गेलो. भेटताक्षणीं त्यांना फार आनंद झाला व " शेवटीं बाबांनी तुम्हांला शिर्डीस आणले ना ? " असे म्हणाले. कांही वेळ त्यांच्या येथे थाबून आम्ही कोपरगांवास आलो व तेथून नगरास परत गेलो. येथ-पर्यंत पहिल्या भेटीची हकीगत झाली.

नंतर त्याच वर्षी डिसेंबरांत नाताळची सुटी संपण्याच्या सुमारास मला पुण्याहून घरच्या मंडळीसह पुन्हा खानदेशांत जावयाचे होते. तेव्हां दौंड मन-माड रेल्वेने जाऊन वाटेत श्री साईबाबांचे दर्शन घ्यावे असा विचार मी केला, व आमच्या कुटुंबाचीही इच्छा शिर्डीस आमच्याबरोबर जाण्याची दिसल्या-मुळे आम्ही सर्वांनीच शिर्डीस जाण्याचा बेत ठरविला ज्या दिवशीं आम्हांस पुण्याहून निघावयाचे होते त्या दिवशीं दुपारी सुमारे दोन वाजतां मी बुधवारांत जाऊन जी आय्. पी. च्या ब्रॅंच ऑफिसांतून तिकिटे खरेदी केली व एक रेल्वे गाईडही विकत घेतले व परत निघालो. त्या

वेळी दौंडकडे जाणारी गाडी पुण्याहून सध्याकाळी ६॥ वाजतां सुटते असा माझा समज होता, आणि त्याप्रमाणे मी निघण्याची सर्व तयारी केली होती. तिकिटे घेऊन मी बिऱ्हाडाकडे जावयास निघालो, परंतु बुधवार चौकात येईपर्यंत मी कांही तरी विसरलो असे मला वाटू लागले, म्हणून पुन्हा तिकिट ऑफिसात गेलो, व माझी कांही वस्तू तेथे राहिली आहे की काय म्हणून पाहू लागलो. तेव्हा तिकिटमास्तरांनी अत्यन्त प्रेमळपणे मला काय पाहिजे म्हणून विचारले व तिकिटे बरोबर आहेत ना ? छत्री किंवा काठी बरोबर आणिली असल्यास ती आहे ना ? असे विचारले, व मीही सर्व बरोबर आहे म्हणून पायऱ्या उतरूं लागलो, परंतु उतरतांना गाडीची वेळ सध्याकाळी ६॥ च आहे ना ? असे सहज विचारल्यावरून तिकिटमास्तरांनी गाडीची निघण्याची वेळ बदलून ६॥ ची ५॥ जाहली आहे असे सांगीतले. तेव्हां मी धांदलीने तागा करून बिऱ्हाडाकडे परत जाण्यास निघालो. मध्यंतरी वाटेत एका फुल-माळ्याला एक शेरा तयार करण्यास सांगून पुढे रेमार्केटांत थोडी फळे बाबांकरितां घेण्यासाठी गेलो, त्या वेळी एका बागवानाने पुढे येऊन मला बसावयास खुर्ची देऊन तो कांही फळे एका करंडीत भरू लागला, तेव्हा मी म्हणालो "अहो तुम्ही फळे भरू लागलां आहां, परंतु त्यांची किंमत काय हे तर आधीं सांगा ?" तेव्हां तो म्हणाला, "त्याची काळजी नको सर्व ठीक होईल," व पुढे म्हणाला "कांही द्राक्षे व अंजीर घालू का ?" असे म्हणून त्याने द्राक्षांचा एक लहानच घड व थोडे अजीर त्या करंडीत घातले, व करंडीचे झांकण लावून व ती दोरीने बांधून माझ्यापुढे केली व "एकदर एक रुपया झाला" असे सांगितले, व मी एक रुपया काढून त्याच्या हातांत ठेऊन लगबगीने बिऱ्हाडी जाऊन सामानाची बांधाबांध करून सर्व कुटुंबासह स्टेशनवर जाण्यासाठी निघालो व जातांना वाटेत माळ्याकडून शेरा घेऊन कसा तरी गाडी निघण्याच्या पूर्वी सुमारे १५ मिनिटे पुण्याच्या स्टेशनवर पोहों-चलो माझ्याबरोबर सामान बरेच असल्यामुळे त्याचे वजन करून लगेजमध्ये टाकणे जरूर होते. सुदैवाने लगेज क्लार्क ओळखीचा होता. त्यांनें सामान

तावडतोब वजन करून पास दिला व आम्ही सर्व मंडळी प्लेट फॉर्मावर कसे तरी पोचलो समोरच बायकांचा थर्ड क्लासचा डबा होता त्यांत जेमतम आमच्या कुटुंबास व मुलांस चढवून सामानाची व माझी स्वतःची बसण्याची सोय पाहू लागलों इतक्यांत शिटी देऊन व हिरवे निशाण फडकावून गार्डाने गाडी चालू करण्याबद्दल ड्रायव्हरला इशाराही दिला. म्हणून कुटुंबास व मुलांस लगबगीने डब्यांतून उतरून घेतलें व जवळच्या सेकंड क्लासच्या डब्यांत आम्हां सर्वांस सामानासह बसूं देण्याबद्दल गार्डास परोपरीने विनविले इतकेच नव्हे तर दौंड स्टेशनवर पोहोचल्याबरोबर सेकंड क्लास व थर्ड क्लास यांच्या भाड्यांतील फरकाची रक्कमही देण्यास कबूल झालों. परंतु त्याने कांहीं एक न ऐकतां पुनः शिटी देऊन ड्रायव्हरनेही शिटी दिली. त्या वेळीं माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना करणे कठीण आहे. क्षणभर मी साईबाबांचे स्मरण करून तेच आम्हांस शिर्डीस नेतील, असे आपले स्वतःचे समाधान करीत आहे, इतक्यांत एकाएकी मुख्य स्टेशनमास्तर माझ्यापाशीं आला व मोठया आनंदानें मला काय पाहिजे आहे अशी त्याने चौकशी केली. मी शक्य तितक्या थोडक्यांत माझी अडचण त्याच्या नजरेस आणून दिली व त्यानें दोन्ही हात वर करून चालू झालेली गाडी थांबविली इतकेच नव्हे, तर स्टेशनवरील चारपांच हमालांस हांक मारून आमच्या सर्व सामानासह आम्हांस सेकंड क्लासांत बसवून व आम्हांस कोणत्याही प्रकारचा उपसर्ग न देण्याबद्दल गार्डास बजावून आम्हांस निरोप दिला. पुढे दौंडास गाडी बदलून दुसऱ्या दिवशीं आम्ही कोपरगांवास पोहचलो, व आमचे मित्र श्री बाळासाहेब मिरीकर यांचे घरीं गेलो, व आम्ही शिर्डीस जाण्याचा बेत त्यांस कळविला. त्यानींही आमचीं स्नाने वगैरे होईपर्यंत टांग्याची व्यवस्था केली व शनिवार असल्यामुळें सकाळींच कचेरी करून जेवण्यासाठीं आमची वाट पाहतो असे सांगीतलें. आमच्याबरोबर फराळाचें होतेच त्यामुळे कोपरगांवास फार वेळ न थांबतां आम्ही टांग्याने शिर्डीस गेलो. गांवाजवळ पोचलों त्यावेळीं बाबा लेंडीवर जाण्याकरितां निघाले होते, तरी मी टांग्यांतून उतरून त्यांच्या पायां

पडलो, तेव्हां त्यानी " गांवात जा, मी आतां येतोच " असे सांगितले. त्या प्रमाणे आम्हीं आमचे मित्र बाळासाहेब भाटे यांच्या घरी गेलो. तेथे रा. रा. माधवराव देशपांडे ( श्यामा ) व. भ. प. दासगणू यांची गांठ पडली. रा. रा. बाळासाहेब यांचे घरी चहा घेऊन व थोडा फराळ करून आम्ही बाबांच्या दर्शना करितां मशिदींत गेलो. व त्यांस सर्वांनी नमस्कार करून बरोबर आणिलेला शिरा व फळे त्यांस अर्पण केली. त्या फळां पैकीं एक सत्र फोडून त्यापैकी कांहीं फाकी बाबांनी आम्हास प्रसाद म्हणून दिला व बाकीचीं फळे इतर मंडळीस वाटली. मशिदीत जाण्यापूर्वी त्या दिवशीं आम्ही शिर्डीस मुक्काम करावा असा बाळासाहेब भाटे यांचा आग्रह होता. परंतु बाळासाहेब मिरीकर आमची वाट पाहाणार आहेत तेव्हां राहातां येणार नाहीं असे त्यांस सांगितले होते. श्री साईबाबांचें दर्शन होऊन आम्हांस उदी प्रसाद मिळाल्या-वर माधवराव देशपांडे यानी "आम्ही आज येथे मुक्काम करावा ना ?" असे विचारल्याबरोबर श्री साईबाबा म्हणाले:—"पोरे बाळे आणिली आहेत. फराळ करून जातील. साहेब तेथे वाट पाहातो आहे." श्री साईबाबा हे मिरीकर मामलेदार यांस " साहेब " असे म्हणत असत असे मला मागाहून समजलें, व बाबांच्या सर्वसाक्षित्वाची कल्पना होऊन मोठे कौतुक वाटले. या प्रसगीं आणखी एक गोष्ट घडली ती अशीः—माझ्या परिचयाचा एक तरुण गृहस्थ त्याच सुमारास बाबांच्या दर्शनाकरितां मशिदीत येऊन जरा दूरच बसला होता. परंतु बाबानीं आम्ही नेलेली फळे प्रसाद म्हणून जमलेल्या लोकांना दिलीं. त्या वेळीं या गृहस्थास मुद्दाम जवळ बोलावून त्यासही प्रसाद दिला. व त्याला फार धन्य वाटलें. नंतर त्यास नुसती उदी देऊन आशीर्वाद न देतां एका मुसलमानाकडून फात्या देवविला, याचे गूढ मला कळले नाहीं. नंतर आम्ही दुपारी सुमारे १ वाजतां कोपरगांवास परत येऊन पुढे खानदेशांत गेलो. ही माझी शिर्डीस जाण्याची दुसरी खेप.

त्यानतर १९१० मध्ये ऑगस्ट--सप्टेंबरच्या सुमारास मला पूर्व खान-देश जिल्ह्याचे मुख्य ठिकाण म्हणजे जळगांव येथे सरकारी कामानिमित्त

जावे लागले होते. त्या वेळीं माझा मुक्काम माझे मित्र रा. रा. विनायक बाबाजी ऊर्फ बाळासाहेब घाणेकर हे ज्या घरांत भाड्याने राहात होते त्याच्याच दुसऱ्या रिकाम्या भागांत होता. बाळासाहेब घाणेकर हे त्या वेळी कलेक्टरचे हेड क्लार्क होते. एके दिवशीं नेहमीप्रमाणें जेवण झाल्यावर ऑफिसांत जाण्या करितां माझ्या बसावयाच्या खोलीत कपडे घालण्यासाठीं त्या खोलीची कडी काढून मी आंत शिरलो त्या वेळीं अत्यंत सुगंधी उदबत्तीच्या वासामुळे सर्व खोली भरून गेल्याचा भास झाला व दहा मिनिटे विश्रांतीकरिता बसलो असताना माझे कुटुंब तेथे आले. त्यांनाही तोच अनुभव आला. तेव्हां हा वास कोठून येत असावा याबद्दल आमचा तपास सुरू झाला. कदाचित् बाळासाहेब घाणेकर यांच्या बायकोची पूजा नुकतीच आटपून त्यांनी उदबत्ती लावली असेल असे वाटल्यावरून आमच्या कुटुंबाने तिकडे जाऊन पाहिले. त्या वेळीं पूजा आटपून बराच वेळ झाला होता, व बाळासाहेब यांच्या कुटुंबाचे जेवण चालले होतें असे आढळून आल्यावरून कांहींच उलगडा होईना. इतक्यांत बाळासाहेबांच्या कुटुंबाने कां आलां होतां असे विचारल्यावरून आमच्या कुटुंबाने उदबत्तीच्या वासाबद्दल हकीकत सांगितली. तेव्हां "तुम्ही कधी शिर्डीस गेलां होतां कां ?" असा प्रश्न काकूनी विचारला. त्यावर "होय" असे उत्तर आल्यावर काकू म्हणाल्या की, "शिर्डीस जाऊन आलेल्या लोकांस असा अनुभव येत असतो." यानंतर उदबत्तीच्या वासाबद्दल अनुभव एकदां आम्ही कराचीस असताना व त्यानंतर १९१६ मध्यें नाशिक मुक्कामी मी डबल न्युमोनियाने आजारी असतांना आलेला आहे. सन १९१७ मध्ये मी शिकंदराबादेजवळ बोलाराम म्हणून मिलिटरी कॅंप आहे तेथे अकाउन्ट ऑफिसांत बदली झाल्यामुळे गेलो, त्या वेळीं एकाएकीं स्फूर्ति होऊन दर गुरुवारी संध्याकाळी आम्ही श्री साईबाबांची तसबीर पुढे ठेवून आरती करूं लागलो, व तो क्रम आजतागायत चालू आहे.

आतां थोडे मागें गेले पाहिजे. कारण या उदबत्तीच्या वासाबद्दल अनुभव लिहितांना बरेंच पुढे जावें लागलें आहे. सन १९१०च्या ऑक्टोबर अथवा नवेंबर महिन्यांत मला धुळ्याहून कांहीं जरूरीच्या कामाकरितां मुंबईस जावयाचे होते. व मी एका गुरुवारीं धुळ्याहून निघून मनमाड दौंड लाईनने कोपरगांवास उतरून शिर्डीस बाबांचे दर्शन घेऊन व त्यांची परवानगी घेऊन पुढें मुंबईस जाणार होतो. त्या सुमारास माझ्या एका स्नेह्याचा दौरा सुरू असून त्याचा मुक्काम खुद्द मनमाडास होता. मी मुबईस जाणार आहे ही बातमी त्यांना असल्यामुळे त्यांनी मला मनमाडास एक दिवस त्यांचे क्यांपमध्ये राहाण्याबद्दल आग्रहाचे निमंत्रण दिले होते. पूर्व संकेताप्रमाणे मी शिर्डीस गेलो व माझे मित्र कै. तात्यासाहेब नूलकर यांचे बिऱ्हाडीं उतरून थोड्याच वेळांत श्री सांईबाबांचे दर्शनाकरितां मशिदीत जाण्यास निघालो इतक्यांत वाटेत बाबांची भेट झाली. त्या वेळीं ते नित्याप्रमाणें लेंडीवर जाण्याकरिता निघाले होते. तात्यासाहेबांनी मी आल्याबद्दल बाबांस पुनः सांगितलें. तेव्हां बाबा म्हणाले, " बेटा लई दिसानीं आला आहे. या खेपेला त्याला लई खर्च आहे " दुपारी जेवणखाण आटोपल्यावर बाबांचें दर्शन घेऊन त्यांची परवानगी मागण्याकरितां आम्ही ( म्हणजे तात्यासाहेब व मी ) मशिदींत गेलों व दर्शन घेऊन परवानगी मागितली. कारण त्या दिवशी म्हणजे शुक्रवारीं रात्रीं मनमाडास आमच्या स्नेह्याच्या क्यांपांत एक रात्र काढून दुसऱ्या दिवशीं पुढे मुंबईस जावयाचे होतें. मशिदींत थोडा वेळ बसल्यावर बाबांची परवानगी मागितली. तेव्हां बाबा म्हणाले " घाई कशाला ! तो तेथे नाहीं " याचा अर्थ मला त्या वेळीं समजला नाही, पण पुढे असे कळलें कीं, ज्या गृहस्थांच्या क्यांपमध्यें मी उतरणार होतो त्यांस कलेक्टरची एकाएकीं तार येऊन ते नाशकास परत गेले होते. असो. मी ज्या कामाकरितां मुबईस जाण्याकरितां धुळ्याहून निघालो होतों त्यासाठीं सोमवार सकाळपर्यंत मुंबईस जाणे जरूर होते. परंतु शुक्रवारपासून आदितवारपर्यंत बाबांची परवानगी मागितली असतां त्यांनी दिली नाहीं. त्या अवधीत एके दिवशी सकाळीं कै. भाऊसाहेब

दीक्षित, कै. तात्यासाहेब नूलकर व मी असे सकाळी प्रातर्विधीकरतां निघालो असतांना त्या दोघांनी मला विचारले " बाबांच्यावर तुमची श्रद्धा आहे ना ? बाबानी जाण्यास परवानगी दिली नाहीं तर तुम्ही आपल्या कामाचे काय करणार ? " मी म्हणालो बाबांच्यावर माझी पूर्ण श्रद्धा आहे. मी गेल्याने माझें अनहित होणार असेल म्हणूनच कदाचित् बाबा परवानगी देत नसतील. याप्रमाणे चाललें असतांना एके दिवशी तिसऱ्या प्रहरीं बाबांचे जवळ मी व रा. माधवराव देशपांडे ऊर्फ श्यामा बसलो असतांना माधवराव बाबांस म्हणाले " त्याला कां जाऊं देत नाहीं ? त्याचे जरूरीचें काम असेल ? " तेव्हां बाबा म्हणाले, " तो तुझे घरीं आला आहे कां माझ्या घरीं ? तुझा आग्रह कां ?" व मला म्हणाले, "भिऊ नको, माझ्याकडे आला आहेस ना ? " हा सर्व प्रकार शुक्रवारपासून मंगळवारपर्यंत म्हणजे पांच दिवस सारखा चालला होता. मगळवारीं अगदी संध्याकाळीं मी बाबांच्या पायांवर मस्तक ठेवून नमस्कार करते वेळीं बाबांनीं माझ्या मस्तकावर कांहीं वेळ हात ठेवून " ऊठ उदी घे व आज पाहिजे तर जा " असे सांगितले. त्याप्रमाणें उदी बाबांच्या हातीं देऊन त्यांनी ती माझ्या कपाळावर लावल्यानंतर मी मशिदींतून परत जाण्याकरितां पहिल्या पायरीवर उतरलो. इतक्यांत बाबा म्हणाले, " आज नको जाऊं, आज पाय लई दुखत्यात. उद्यां जाशील. " तेव्हां मी पुनः वर मशिदींत जाऊन बाबांचे पाय दाबीत कांही वेळ बाबांच्याजवळ बसलो, व थोडया वेळाने बिऱ्हाडीं परत आलो. कै. भाऊसाहेब वगैरे सर्व मंडळी साठे यांच्या वाडयांतच राहात असे, व आम्ही रात्री एके ठिकाणीच बसून गोष्टी बोलत असूं. अशा एका प्रसंगी, वरील पांच दिवसांतच, एका रात्रीं कै. तात्यासाहेब यांनीं एक चिलीम काढून त्यांत तबाकू भरून ती ओढू लागले, तेव्हां मी सहज विचारले--" ही चिलीम कोठून आणलीत ?"--तेव्हां ते म्हणाले--" ही चिलीम मला बाबांनी दिली. " यावर मी म्हणालो, " बाबांची आठवण म्हणून ही चिलीम मी घेऊन जातो. " तात्या म्हणाले, " ही कशाला ? तुला पाहिजे तर बाबांच्या जवळून दुसरी

मागून घे " याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळी ८।८॥च्या सुमारास आम्ही मशिदींत गेलो असताना, बाबांनी कांही वेळ माझ्याकडे पाहून रस्त्यावरून जाणाऱ्या एका कुभारास ( हाच कुंभार बाबांस नेहमी चिलमी पुरवीत असे व अशा एक दोन कोनाडयात शेकडो पडल्या होत्या ) हांक मारून त्याला म्हणाले, " अरे मला थोडया चिलमी लौकर पाहिजेत, त्या घेऊन ये. " कुंभार निघून गेल्यावर थोडयाच वेळांत बाबानीं रा माधवराव देशपांडयाकडून मशिदीच्या कोनाडयांत चिलमी होत्या त्यांतून दोन काढून आणण्यास सांगितले. व कांही वेळ त्या हातात घेऊन त्या दोन्ही एकदम माझ्याकडे दिल्या व " माझी आठवण म्हणून ह्या चिलमी आपल्याजवळ ठेव " असे म्हणाले. मीही त्या चिलमी मोठ्या आदराने आपल्याजवळ ठेविल्या व बाबाच्या अंतर साक्षीत्वाबद्दल खात्री पटून मला कौतुक वाटलें. त्या रात्री आम्ही नित्याप्रमाणे गोष्टी बोलत झोपी गेलो, परंतु दुसऱ्या दिवशीं म्हणजे बुधवारी उजाडण्याच्या सुमारास मला एक स्वप्न पडले तें असे:—" मी परत घरी गेलो आहे व माझी एक लहान दीड वर्षाची मुलगी मला दारातून हाक मारीत आहे " उजाडल्यावर प्रातर्विधि उरकून मी बाबांचा आशीर्वाद घेऊन शिर्डीहून परत जाण्याचे ठरवून प्रवासाचे कपडे चढवून मशिदीत जाण्याची तयारी केली, तेव्हां श्री हरिभाऊ दीक्षित व श्री. तात्यासाहेब नूलकर यांनी थट्टेने विचारले, " उगीच कपडे करून शिर्डीहून निघून जाण्याच्या तयारीने बाबांच्या दर्शनास चालला आहां, परतु बाबांनी परवानगी नाही दिली तर काय कराल ? " मी म्हणालो,—" मला आज पहांटे दृष्टांत झाला आहे त्यावरून मला आज परवानगी मिळेल अशी खात्री आहे. " आम्ही सर्वजण सकाळी सुमारें ८॥ वाजतां मशिदीच्या पुढील आंगणांत गेलो. त्या वेळी बाबा मोठ्याने शिव्या देत होते, व मशिदीत इकडून तिकडे खेपा घालीत होते. आम्ही कांही वेळ तेथेच थांबलो. लौकरच बाबा मशिदीच्या त्यांच्या नेहमीच्या बसावयाच्या कोपऱ्यांत जाऊन बसल्याबरोबर, आम्ही सर्व मंडळी वर चढलो व मी बाबांच्या

पायांवर डोके ठेविले. त्यावरोबर बाबा म्हणाले, "उदी घे व लवकर परत जा, घरी तुझी मुले वाट पाहात आहेत. हे तात्या काका लबाड आहेत. तुला जेवून जा म्हणून आग्रह करितील, परंतु त्यांचे तूं ऐकू नकोस, एकदम जा." असे म्हणून त्यांनी श्री. माधवराव देशपांडे यांस माझ्याबरोबर कोपरगांवापर्यंत जाण्यास सांगून मला प्रेमाने निरोप दिला.

या नंतर मला श्री साईबाबांचे शेवटचे दर्शन सन १९१६ च्या ऑक्टोबरच्या सुमारास झाले. त्या वेळी मी मोठ्या आजारांतून बरा झाल्यावर यवल्यास सरकारी कामानिमित्त असतांना झाले. त्या वेळीं मी माझ्या मुलांमाणसांसह तांगे करून, येवल्यापासून परभारे शिर्डीस जाऊन त्याच दिवशीं संध्याकाळीं येवल्यास परत आलो. त्या वेळी माझ्यावरोबर माझे व्यवसायबंधु श्रीयुत सोहनी होते. वाटेत गोदावरीवरील सांडव्यावरून परत येतांना आमचा सर्वांचा अपमृत्युच आला होता, तो श्री बाबांच्या कृपेने टळला. त्या वेळीं नदीचे पाणी बऱ्याच जोराने सांडव्यावरून वहात होते, व सांडव्याचे दगडही अस्ताव्यस्त असल्यामुळे घोडयांस तांगा ओढण्यास जड जात होतें व त्यांचे पाय लटपटत होते. आम्ही सर्व घाबरून गेलों, परंतु शिर्डीकडील बाजूच्या नदीच्या तीरावर कांही महार काम करीत होते, त्यांपैकीं दोघा तिघांस बोलावून त्यांच्या मदतीने आमचा तांगा नदीपार झाला व आम्ही यवल्यास सुरक्षित परत आलो.

वर एके ठिकाणी मला मुबईस महत्त्वाच्या कामाकरितां जावयाचे होतें, परतु श्री बाबांची परवानगी घेतल्याशिवाय मी जाणार नव्हतो अशी हकीगत आली आहे. त्याबद्दल थोडा खुलासा करणे जरूर आहे. ज्या कामाकरितां मी मुबईस जाणार होतो त्या कामीं मला यश येईलच असा भरंवसा नव्हता. कारण माझ्या अनहितावर माझ्या ऑफिसांतील एक बड़ा व दुष्ट अंमलदार टपून बसला होता. ही गोष्ट मला पूर्णपणें माहित होती व या कामी माझा असा पूर्ण विश्वास आहे की,

श्री बाबांनी मला शिर्डीसच थांबवून धरून माझ्यावरील आपत्तीच टाळली. व्यवहारिकदृष्ट्या माझे सांपत्तिक नुकसान झाले किंवा मी करून घेतले असा पुष्कळ लोकांचा समज त्या वेळी झाला होता, परतु माझी स्वतःची अशी खात्री आहे की, श्री बाबांनी माझी त्या वेळची आपत्ति टाळली, इतकेच नव्हे, तर लौकीकदृष्ट्या माझे जे सांपत्तिक नुकसान झाले ते अन्य तऱ्हेने नुसते भरूनच काढले इतके नव्हे तर आज तागायत ते माझ्या व माझ्या कुटुंबाचा योगक्षेम उत्तम चालवीत आहेत. श्री सद्गुरू साईबाबा यांच्यावर माझ्या कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तिची अढळ श्रद्धा आहे. ती तशीच कायम राहो अशी श्री बाबांच्या चरणी प्रार्थना करून मी हा लेख पुरा करितो.

सांगली, ता. १२-४-१९३०. **रा. वा. मोडक.**

# उदीचा अनुभव.

सौ. यमुनाबाई सखाराम सामंत. मु. शिळोत्तर. वसई. यांच्या ता. २२-५-३०च्या पत्रांतला उतारा: —

**रा. आ. तर्खड**
संपादक.

" माझी प्रकृति केव्हांही सिक झाली असतां जरी मी लोकोपचार म्हणून इतर औषध घेत असलें तरी पण माझी दृढ श्रद्धा श्री साईबाबांच्या उदीवरच असते. ती घेतल्याशिवाय मजला गुण येतच नाहीं. मला श्री साईबाबाच्या उदीचा उपयोग फारच होत असतो, व कोणत्याही संकटाच्या वेळीं श्री साईबा

बांच्या कृपेशिवाय संकट निवारण होत नाहीं हा मला तरी नेहमींचा अनुभव आहे.

मी मागील पत्री श्री साईबाबांच्या उदीच्या प्रभावानें गाईची सुटका झाली ही हकीगत लिहिली ती त्रिवार सत्य आहे.

गाई उतारवयाची असल्यामुळे ती वितांना तिचे फारच हाल झाले. ते समक्ष पाहिल्याशिवाय पत्री लिहून समजणार नाहीं. अशा वेळीं दुसरा कोणताही उपचार करतां येत नाही. शेवटचा उपचार म्हणून श्री साईबाबांची उदी दिली. तिच्या प्रभावाने तिची लगेच सुटका होऊन गाई व वासरूं दोन्ही अजून सुरक्षित आहेत. आपण लिहितां त्याप्रमाणें आपली मर्जी असली तर वरील अनुभव श्री साई मासिकांत प्रसिद्ध करण्यास माझी हरकत नाहीं. श्री साई बाबांच्या उदीची जितकी प्रसिद्धि होईल तितकी श्री साई भक्तांस आनंददायकच आहे. तरी वरील अनुभव आपण प्रसिद्ध करावा.

श्री साईबाबांची एकनिष्ठ सेवक व दासी

**सौ. यमुनाबाई सखाराम सामंत.**

मु. शिळोत्तर. पोष्ट वसई.

# श्री साई सच्चरित्.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांच्या या अप्रतिम ग्रंथाच्या शेवटल्या अध्यायासंबंधाने कळविण्यास अत्यंत दुःख वाटते कीं, या कळसरूपि अध्यायाची हस्तलिखित पूर्ण प्रत पुष्कळ शोध केला असतांही मिळत नाहीं.

कांहीं तुटक तुटक ओंव्यांचीं चिटोरीं मिळालीं, त्यांची श्रीबाळसाहेब देव यांनीं अत्यंत परिश्रमानें जुळवाजुळव केली आहे. या ओंव्या ७व्या वर्षाच्या १ ल्या अंकांत प्रसिद्ध करण्यांत येतील.

यावरून असे वाटते कीं, श्री सांई बाबांच्या भक्तमालिकेंत कोणी तरी गुप्त रत्न असावे ते असे की, ज्याच्या करवीं या गोड ग्रथाचा कळसरूपि शेवटचा अध्याय पूर्ण केला जावा.

श्री साईबाबांची लीला अगाध आहे हे जाणून असे सुचविण्यांत येत आहे कीं, या ग्रंथाचा शेवटचा अध्याय श्री शारदेच्या भक्तांनी काव्यरूपाने जरूर पूर्ण करावा.

काव्य ओवीबद्ध असल्यास उत्तम; परंतु याविषयी कवीला मुळीच बांधतां येत नाहीं. काव्य कोणत्याही एका अथवा अनेक छंदांत अथवा वृत्तांत कवीने आपल्या स्फूर्तिप्रमाणें लिहिलेले असावे.

परीक्षक श्री बाळासाहेब देव यांना योजिले आहेत. पारितोषिक रुपये पन्नासचें देण्यांत येईल. जें एकच रकमेनें उत्तम काव्यास देणें अथवा पहिल्या तीन उत्तम काव्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें जास्ती कमी विभागून देणे ही गोष्ट श्री बाळासाहेब देव यांच्या निकालावर अवलंबून राहील.

काव्यांची मुदत श्रावण अखेरपर्यंत. त्यानंतर श्री साई सच्चरिताचीं बांधलेलीं पुस्तकें प्रसिद्ध होतील.

**रा. आ. तर्खड**

व्यवस्थापक श्रीसाई लीला

न करितां तुम्ही स्वतः सुदीना मला-अत्यंत दरिद्री जो मी त्या मला विका-निःशंक विकत द्या; अशा दरिद्याला तुला कोण विकत घेईल म्हणून कदाचित् आपण पुसाल, तर माझ्यामध्ये एक गुण आहे त्यावरून मला विकत घेण्यास आपल्यास गिऱ्हाईकहि सांपडतील. तो गुण व त्याचे ग्राहक मी आपल्यास सांगतों ऐका-मज सदाश्रमींचा वास हीं विदित असे,—मज-मला सदाश्रमीचा, सत्-साधुजन-भक्तजन त्याच्या-आश्रमींचा,-आश्रमांतील, वास-राहणे ही विदित असे-माहीत आहे, अर्थात् साधुजनांच्या आश्रमीं कसे वागावें हेहि मला माहीत आहे; हींशब्देंकरून आणखी माझ्या अंगीं थोडेबहुत गुण आहेत, त्यांत हाहि एक गुण आहे, म्हणून साधुजनांस मला विका, अर्थात् साधुजनांच्या स्वाधीन मला करा, असा एथील अर्थ;—याची परीक्षा पाहाणें असल्यास-स्वयें गुण पहा,-स्वयें-स्वतः गुण-साधूच्या सन्निध वास करण्यास जे गुण पाहिजेत ते पहा-परीक्षेस लावा; अर्थात् साधूच्या सन्निध वास करण्यास जे योग्य गुण पाहिजेत ते माझ्या अंगीं आहेत किंवा नाहींत याची परीक्षा करा. स्वयें याच्या ठिकाणी सवें असेंहि पाठांतर आढळतें, तेहि प्रशस्त,-सवें-म्हणजे लागलेच-तत्काळ-प्रत्यक्ष पाहा; असा अर्थ तसें पाठां तर असतां समजावा. आणि मी आपल्या कसोटीस उतरल्यावर-मज सदाश्रमी चाकरा दया करा,—मज सदाश्रमी-निरंतर श्रम घेणारा-अर्थात् श्रमाळशी-मेहनती-अशा-चाकरा चाकराप्रत-चाकरावर दया करा-अर्थात् साधुजनांच्या स्वाधीन करा. पूर्वी पंधराव्या केकेत – 'निजप्रियजनाकडे तरि हि दे हवाला जसी पदेंक समजाविसी तसि करोत' म्हणून जें कवीने म्हटलें होतें, त्याचीच एथें विशद अर्थानें

---

१ आश्रमींचा-एथे आश्रम शब्द सप्तम्यंत असून त्यावरून पुढें चा हा तत्संबंध्यर्थी प्रत्यय झाला आहे. 'घरीच्याच खायास मिळत नाहीं आणि दारींचे मौजा करितात.' अशीं पुष्कळ उदाहरणें आढळतात.

तेचविषयींचेंनिरूपण ॥ श्लोकार्द्धेंसुलक्षण ॥
स्वयेंसांगताहेश्रीकृष्ण ॥ साध्यसाधनविभागें ॥ ८४ ॥

तेचिअर्थींचाप्रश्न ॥ देवासीपुसेआपण ॥
कोण्यायुक्तीदेहाभिमान ॥ जन्ममरणभोगवी ॥ ९३ ॥

एकना. भा. अ. २२;

पुनरुक्ति केली आहे. एथें कवीनें सत्समागमाविषयी जो आपला इतका आग्रह दाखविला तो योग्य आहे. कारण, सत्समागमाचे फल फार मोठे सांगितलें आहे.[1]

---

१ योगवासिष्ठात म्हटले आहे,—

नयज्ञतीर्थैर्नतपःप्रदानैरासाद्यतेतत्परमपवित्रं ।
आसाद्य तेक्षीणभवामयानांभक्त्यासतामात्मविदायदंग ॥

—योगवासिष्ठ, निर्वाण प्र. सर्ग ४१.

तुकोबानेहि भगवद्भक्तांच्या समागमाविषयी आपली अत्यंत आवड दाखविली आहे,—

जेगातीअखडविठ्ठलाचेगीत । त्यांचेपायीचित्तठेवीनमी ॥
जयासीआवडेविठ्ठलाचेनाम । तेमाझेपरमप्राणसखे ॥
जयासीआवडेविठ्ठललोचनी । त्याचेपायवणीस्वीकारीन ॥
विठ्ठलासीजिहीदिलासर्वभाव । त्याच्यापायीजीवठेवीनमी ॥
तुकाम्हणेरजहोईनचरणीचा । म्हणवीतित्याचाहरिचेदास ॥ ५ ॥

धनापरिजनाघरींतुमच्चियाउणेंकायसें।
नलाभमणिहेमभूपतिसजोडिल्याआयसें॥
परिप्रभुहिसंग्रहींसकलवस्तुलाठेविती।
गुणानम्हणतांउणाअधिकआदरेंसेविती॥ २३॥

माझे भक्तजन बहुतकरून निष्कांचन असतात; तेव्हां ते तुला काय मोल देऊन घेतील, आणि तूहि निष्कांचन तेव्हां त्यांस तुझा उपयोग तरी काय, अशी मागल्या केकेवरून भगवंताची आशंका आपल्या मनांत आणून कवि तिचें समाधान करित होत्साते म्हणतात.

पदान्वयः—तुमचिया परिजना घरीं धना कायसें उणें, मणिहेमभूपतिस आयसें जोडिल्या लाभ न, परि प्रभु हि सकल वस्तुला संग्रहीं ठेविती, गुणा उणा न म्हणतां अधिक आदरें सेविती.

तू म्हणतोस कीं, मी निष्कांचन आहें, म्हणून म्यां तुला उताराकरितां आपल्या भक्तजनांस विकावें, तर माझे भक्तजनहि तुझ्याचसारिखे निष्कांचन आहेत, तेव्हां ते काय तुझें मोल देतील, असें कदाचित् आपण मला पुसाल. तर कवि म्हणतात ऐका – तुमच्चिया परिजना घरीं धना कायसें उणें,— तुमच्या परिजना–सेवकजनाला घरीं–आपल्या घरीं धना–धनाला कायसें–काय उणें; तुमच्या भक्तांच्या घरीं द्रव्याचा कांय तोटा आहे? अर्थात् कांहीं तोटा नाहीं. लक्ष्मीपति तुम्हीं तुमच्या सन्निध वास करणाऱ्या जनांस द्रव्याची न्यूनता केवळ असंभाव्य असा एथे परिजनशब्देंकरून कविहृद्गतार्थ दिसतो. अथवा, (महाराष्ट्र पद्यांत घरीं इ० सप्तम्यंत शब्दावरून मागील षष्ठ्यंत प्रत्ययाचा क्वचित् लोप होऊन तन्निमित्त नुसतें सामान्यरूपच राहातें, असाहि नियम आढळतो; त्यावरून एथें 'परिजना घरीं' म्हणजे 'परिजनाच्या घरीं' असा अर्थ केला असतांहि केवळ अप्रशस्त होत नाही.[1] अथवा, समीपता मुक्ति ज्यांस तुम्हीं दिली असा

---

१ तुम्हाघरींगाईम्हशी संताघरींउंदिरघुशी
तुम्हाघरींसोनेंनाणें संताघरींपत्रळभाणें
तुम्हाघरींवाडेघोडे संतापायींनमिळनीजोडे
—तुकाराम.

एथेंही 'तुम्हा घरीं,' 'संतां घरीं,' 'संता पायीं,' यांत याच अर्थाप्रमाणें प्रयोग जाणावा.

तुमच्या भक्तांचा वास तुमच्या घरी असतां, मग तेथे त्यांस प्रकाशांत अंधःकारा-प्रमाणे दरिद्रतेचा केवळ असंभव, म्हणून तुमच्या घरी तुमच्या भक्तांस द्रव्याची किमपि न्यूनता नसता उलटी त्याची विपुलता आहे; मग अशा तुमच्या श्रीमान्[1] भक्तांस मला विकत देण्यास तुम्हास कांही अडचण आहे असे मला दिसत नाहीं. यावरहि कदाचित् आपण म्हणाल की, जर ते श्रीमंत आहेत तर ते तुजसारिखा निष्कांचन गुणहीन अशास कशाकरितां आपल्याजवळ ठेवितील ? तर ऐका- **मणिहेमभूपतिस आयसें जोडिल्या लाभ न**,–मणिहेमभूपतिस,–मणि–रत्नादि हेम-सोनें भू-भूमि यांचा जो-पति-स्वामी त्यास, अर्थात् ज्याजपाशी रत्नसुवर्णादि द्रव्याची समृद्धि आहे त्यास, **आयसें**[2]-लोखंड **जोडिल्या**-जोडिल्याने–मिळाल्यावर **लाभ न**—लाभ नाही; हे खरें आहे-**परि प्रभु हि सकल वस्तुला संग्रही ठेविती,**—परि–परंतु–तथापि प्रभु–समर्थ–अर्थात् श्रीमंत लोक आहेत ते **सकल वस्तुला**–साऱ्या वस्तूना–अर्थात् लोखंडापेक्षांहि अत्यंत हलक्या मोलाच्या वस्तु तृणपाषाणादि त्यांसही **संग्रही ठेविती**–अर्थात् आपल्या संग्रहांत ठेवितात, आणि अशा वस्तु संग्रही ठेवूनहि त्यांच्या-**गुणा उणा न म्हणतां अधिक आदरें**

---

१ तशीच भगवद्भक्ताची श्रीमत्तहि तुकोबाने पुढल्या अभंगात दाखविली आहे.

एकातालोकातीकरूगदारोळ । लेशतोहीमळनाहीयेथे ॥ १ ॥
ध्यावेद्यावेआम्हीआपुलीयेसत्ता । नदंखोपुसतादुजाकोण्ही ॥ २ ॥
भाडाराचीकिलीमाझेहातीआहे । पाहिजेतोपाहेवानयेथें ॥ ३ ॥
तुकाम्हणेआम्हाविश्वासाच्याबळें । ठेविलेमोकळेयेथेंदेवे ॥ ४ ॥

२ लोहोऽस्त्रीशस्त्रकंतीक्ष्णंपिंडकालायसा यसी
अश्मसारोऽथमडूरसिंहाणमपितन्मले
सर्वस्यात्तैजसलोहंविकारस्त्वयस कशी

—अमर.

एथें **आयसें** हे ग्रथभाषेप्रमाणें **आयस** शब्दाचे नपुंसकलिंगी कर्मणिप्रथमेचें रूप जाणावे. अथवा, **आयसें** म्हणजे ‘ आयसाने ’ असें तृतीयेचें रूप मानिले असताहि चिंता नाही. परंतु असे तृतीयेचे रूप मानिल्यावर प्रथम ते, ‘ जोडिल्या ’ हे उभयविध क्रियापदास सकर्मक मानिले असता त्याचे कर्म, आणि अकर्म मानिले असता त्याचा कर्ता करून आणि त्याचा अध्याहार करून मग ते तृतीयेचें रूप केले पाहिजे.

सेविती,—गुणा-गुणाला उणा[1]-उणा असे न म्हणतां उलटे त्यांस-अधिक-अत्यंत आदरें-आवडीने सेविती-सेवन करितात; अर्थात् त्यांचा उपयोग करितात. साराश, जे शोकी आणि समर्थ असे लोक आहेत, ते कोणत्याहि वस्तूच्या गुणाचा अनादर न करितां तत्तद्गुणाचा उपयोग करण्याकरितां सर्व वस्तु आपल्या संग्रहीं ठेवितात, अर्थात् तुमचे भक्तजन मी दरिद्री व गुणहीन आहे म्हणून माझी उपेक्षा करणार नाहीत, उलटें याच कारणाने आपल्या दयेने माझा अधिक उत्सुकतेने अंगीकार करितील[2], यास्तव तुम्हीं निःसंशय मला त्यांच्या स्वाधीन करा असा अर्थ.

---

१ एथे ‘ गुणा ’ या आकारान्त पदाशी मिळविण्याकरिता ‘ उणा ’ या आकारान्त पदाची शब्दालंकारार्थ योजना जाणावी. उणा या शब्दाचा एथे विशेषणाप्रमाणें प्रयोग केला आहे. ‘ मी तास भली म्हणतो, ’ ‘ तो त्यास दाडगा मानितो, ’ अशी आणखी या प्रकारची उदाहरणे जाणावी

२ भर्तृहरिनीतिशतकातहि थोरांची अशीच गुणग्राहकता सागितली आहे,—

मनसिवचसिकायेपुण्यपीयूषपूर्णा—
त्रिभुवनमुपकारश्रेणिभि.प्रीणयंत ।
परगुणपरमाणुपर्वतीकृत्यनित्यं
निजहृदिविकशत संतिसंत'कियंतः ॥ १५ ॥